# " ज्ञानाची शेती "

## विषमुक्त (Residue Free) शेवगा लागवड तंत्रज्ञान

**श्री. अंकुश बरडे, एम.एस.सी. (कृषी)**

शेवगा पिकाची लागवड जगभरामध्ये उष्ण व समशितोष्ण कटिबंधातील प्रदेशामध्ये करण्यात येते. शेवग्याची सर्वात जास्त लागवड भारतात होत असून त्या खालोखाल, अफ्रिकन देश व फिलिपाईन्स, इंडोनेशिया व मलेशिया या देशामध्ये शेवगा लागवडी खालील क्षेत्र आहे. भारतातील आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, मध्य प्रदेश व महाराष्ट्रात या राज्यात पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. शेवग्याची विविध उत्पादने आपण संयुक्त अरब इमिरात, कुवेत, सौदी अरेबिया ई. देशास निर्यात करत आहोत. हे पिक अत्यंत मुरमाड, खडकाळ, मध्यम जमिनीत घेता येते व यास पाण्याची गरज ही अल्प असते व किड रोगांचा फारसा प्रार्दूभाव होत नाही त्यामुळे या पिकाखालील क्षेत्र वरचेवर वाढत आहे. आपल्या देशाची स्थानिक गरज भागवून ईतर देशामध्ये निर्यातीस भरपूर वाव आहे. त्यासाठी आपण आज विषमुक्त (Residue Free) शेवगा लागवड उत्पादन तंत्रज्ञान पाहणार आहोत.



**शेवग्याचे आहारातील महत्व** :- शेवग्याचा वापर शेंगाची भाजी, कोवळ्या पानाची भाजी, फुलांची कोशिबीर या प्रकारे केला जातो. शेवग्याच्या शेंगा व पानामध्ये कर्बोदके, " अ ", " ब " आणि " क " जिवनसत्व तसेच लोह व चुना ही खनिजे मुबलक प्रमाणात असतात. यामध्ये लिंबाचे सातपट जिवनसत्व " क ", गाजराचे दहापट जिवनसत्व " अ ", केळीचे पंधरापट पोटॅशियम व दूधापेक्षा सतरापट प्रोटीन असते. त्यामुळे यास आहारात व जिवणशैलीसाठी अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. तसेच यांचे पानातील लोह, कॅल्शियम, प्रोटीन, ई. चे प्रमाण ईतर प्रचलित भाज्यापेक्षा खूपच जास्त आहे. यामुळे शेवग्यास "मल्टी व्हिटॅमिन" असे म्हणतात.

शेवग्याचे बियापासून तेल काढले जाते त्यास " बिन ऑईल " जे औद्योगिक इलेक्ट्रानिक वस्तु करिता वंगण म्हणून वापरतात, शेवग्याचा वापर ग्रीन टी, रस, सॅलड इ. मध्ये मोठ्या प्रमाणात वापर वाढत आहे. शेवगाचे आहारातील, उद्योगातील महत्व व शेवग्याचे सर्व भागापासून होणारा उपयोग होत असल्याने यास " कल्पवृक्ष " म्हणतात. त्यासाठी शेवग्याचे रसायन मुक्त / विषमुक्त (Residue Free) उत्पादनासाठी फार मोठ्या प्रमाणात देशांतर्गत व निर्यातीसाठी वाव आहे त्यासाठी शेवगा या पिकाचे उच्च तंत्रज्ञान आधारित उत्पादन पध्दती आपण आज पाहणार आहोत.

**शेवगा लागवड का करावी ?**

- कमी कालावधीत व कमी उत्पादन खर्चात चांगले उत्पन्न मिळते.
- वर्षभर मागणी असते व चांगला बाजारभाव मिळतो.
- कमी कष्टात, कमी लागवड खर्चामध्ये उत्पादन घेता येते.
- कोरडवाहू भागात, कमी पाण्यावर पिक घेता येते.
- हलक्या ते मध्यम, माळराणाचे, पडीक क्षेत्रावर व बांधावर लागवड करता येते.
- दुष्काळ, अवर्षकपर स्थितीमध्ये हे पिक तग धरू शकते.
- परसबागेत, रस्त्याचे कडेला, गायरानावर लागवड केल्यास कुपोषणावर मात करता येईल.
- केंव्हाही लागवड करता येते. लागवडीनंतर 6-7 महिण्यात उत्पादन सुरू होते
- रासायनिक खत व किडनाशकांच्या कमी वापर करून या आरोग्यदायी फळभाजीचे उत्पादन घेता येते.
- शेवग्याची टिकवणक्षमता ईतर भाजीपाला, फळभाज्या, शेंगभाज्याच्या तुलनेने सगळ्यात जास्त आहे त्यामुळे काढणीत्तोर नुकसान होत नाही.
- आहाराचे दृष्टीने हे या पिकाची पोषणमुल्य अत्यंत जास्त आहेत.
- शेंगवर्गीय पिक असल्याने हवेतील नत्र स्थिरीकरणाचे काम करून जमिनीची सुपिकता वाढविणारे पिक.
- आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी, लिंबू ई. जास्त अंतरावर लागवड केलेल्या फळबागेमध्ये आंतरपिक म्हणून शेवगा पिकाची लागवड केल्यास मुख्य पिकाचे उत्पादन सुरू होण्यापूर्वी या पिकापासून शेतकरी चांगले अर्थाजन करू शकतात तसेच या पिकाचे छाटणीचे अवशेष पाने ई. मुळे जमिनीस सेंद्रिय पदार्थाचा चांगला पुरवठा होतो व मातीचा सेंद्रिय कर्ब वाढण्यास मदत होते तसेच मुख्य पिकास हवेतील नत्र उपलब्ध करून दिला जातो.

**शेवगा लागवडीसाठी पुरक बाबी** :- आपल्याकडील शेवगा पिकास मानवणारे हवामान, हलक्या, मुरमाड जमिनी, पडीक जमिनी, उपलब्ध तंत्रज्ञान, उच्च उत्पादनक्षम वाण ई मुळे शेवगा उत्पादन घेण्यासाठी खूप मोठा वाव आहे. या पीकाची लागवड फळबागेमध्ये आंतरपिक, बांधावर, रस्त्याचे कडेने तसेच परसबागेमध्ये करण्यासाठी व स्वत:चे पोषण तसेच थोडेफार अर्थाजन करण्यासाठी हे चांगले पिक आहे. सलग लागवड करून ऊस, कापूस, केळी पिकासाठी हे पर्यायी पिक होऊ शकते गरज आहे ती म्हणजे शेवग्याचे उच्च तंत्रज्ञान माहिती करून आत्मसात करण्याची.

**आवश्यक हवामान** :- या पिकास उष्ण, समशितोष्ण व दमट हवामान पोषक असते. साधारणपणे 25-35$^0$C तापमानात शेवग्याची वाढ चांगली होते. तापमान 40$^0$C पेक्षा अधिक असल्यास फूलगळ होते तसेच 18$^0$C पेक्षा कमी तापमान गेल्यास या पिकाची वाढ खुंटते. हे पीक उष्ण तापमान व मोठ्या काळोख्या रात्री तसेच एकसारखे ढगाळ हवामान व सततचा रिमझिम पाऊस या पिकास हाणीकारक असतो, त्यामुळे फुलोरा उशीरा येतो, फूलगळ, फळगळ होते त्यामुळे उत्पादनात घट होते. या पिकामध्ये चांगले परागीभवन होण्यासाठी 25-30$^0$C तापमान आवश्यक असते. जास्त तापमान व अति थंडी या पिकास मानवत नाही.

आपल्याकडील सर्व प्रकारचे विभागातील हवामान या पिकास लागवड करण्यास उत्तम आहे. अतिपाऊसाचे दिवस वगळून ईतर दिवसात यापासून आपणास उत्पादन मिळू शकते.



**जमिन** :- हलक्या ते मध्यम आणि पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या जमिनी या पिकाचे लागवडीसाठी उत्तम समजली जाते. भारी, काळ्या खोल जमिनीत झाडे जोमाने वाढतात, शाखीय वाढ जास्त होते त्यामुळे अशा जमिनीत लागवड करू नये. अशा भारी जमिनीत लागवड करावयाची असेल तर कोरडवाहू पिक म्हणून शेवगा पिकाची निवड करावी. तसेच चोपन जमिनीत वाढ चांगली होत नाही. शेवग्यासाठी निवडलेल्या जमिनीचा सामू 6 - 6.5 एवढा असावा. जास्त पावसाचे प्रमाण असलेल्या प्रदेशात उत्तम निचरा असलेल्या जमिनीत या पिकाची लागवड करावी.

**खड्डे खोदणे व खड्डे भरणे** :- या पिकास वर नमूद केले प्रमाणे आपल्याकडील सर्व प्रकारच्या जमिनीत लागवडीसाठी उत्तम आहे. याची लागवड हलक्या, मुरमाड, मध्यम प्रकारच्या जमिनीत हे पिक उत्तम येते. जास्त भारी, काळ्या, खोल कसदार जमिनीत पाण्याचा निचरा उत्तम होत असेल तर या प्रकारच्या जमिनीत ही शेवग्याची लागवड करता येते. उत्तम निचरा असलेली हलकी ते मध्यम जमिन लागवडीस उत्तम परंतू जास्त क्षार असलेल्या जमिनीत शेवग्याची लागवड करू नये.

लागवडीपूर्वी जमिन उभी आडवी नांगरट करून उन्हाळ्यात जमिन तापू द्यावी. शेवग्याची लागवड खड्डे करून करणे आवश्यक असते त्यासाठी 15 एप्रिल पूर्वी योग्य अंतरावर 2 X 2 X 2 फूट खड्डे घेऊन उन्हात चांगले तापू द्यावेत. खड्डे खोदताना वरचा सुपिक थर वेगळा करावा व ईतर मुरूम वेगळा ठेवावा. पावसाचे सुरूवातीला म्हणजे मे मध्ये हे खड्डे भरून घ्यावेत त्यासाठी खड्यात सुरूवातीला पालापाचोळा टाकावा त्यावर शेणखत, सुपिक माती, नंतर मुरूम अशा पध्दतीने खड्डे भरून घ्यावेत. खड्डे भरताना प्रत्येक थरामध्ये 50gm सिंगल सुपर फॉस्फेट, 50 ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर शिंपडून घ्यावी व 1-2 किलो शेणखत चांगले मिसळून घ्यावे. खड्डे जमिन पातळीचे वरते 1/2 ते 1 फूट येतील असे पाहावे व त्यानंतर त्या खड्याचे मधोमध एक छोटी काठी रोवावी.

**लागवडीचे अंतर** :- कृषी विद्यापीठांनी 4 X 4 मि. किंवा 5 X 5 मी. या अंतराची शिफारस शेवगा पिकासाठी केलेली आहे परंतू सद्या उपलब्ध असलेले वाण, छाटणी तंत्रज्ञान व मशागत, काढणी

फवारण्या ई करण्यासाठी सुलभ व्हावे म्हणून शेतकरी कमी अंतरावर शेवग्याची लागवड करत आहेत कमी उंचीच्या वाणाची लागवड 3X3 किंवा 2.5X2.5 मि. अंतरावर करता येते तसेच

काळी कसदार भारी जमिन :- 14 X 8 फूट,

मध्यम जमिन :- 12 X 7 फूट,

हलकी मुरमाड जमिन :- 10 X 5 फूट



या अंतरावर लागवड केल्यास फायदेशीर ठरत आहे. याप्रमाणे दोन ओळीतील व दोन झाडातील अंतर ठेवल्यास प्रत्येक झ ाडास पुरेसा सुर्यप्रकाश, हवा खेळती राहते व भरपूर फांद्या मिळाल्याने उच्च दर्जाचे उत्पादन मिळते तसेच किड व रोगांचा प्रार्दूभाव कमी होत असल्याने उत्पादन खर्चात बचत होते. आपलेकडील असलेला जमिनीचा प्रकारानुसार शेतकऱ्यांनी योग्य ते अंतर निवडून खड्डे खोदून, भरून घ्यावेत.

**लागवडीचा हंगाम** :- शेवगा या पिकाची लागवड तिनही हंगामामध्ये करता येते परंतू विभागवार पर्जन्यमाना नुसार पुढीलप्रमाणे लागवड करावी. कमी पावसाचे प्रदेशात खरिप हंगामातील लागवड 20 मे - 15 जुलैपर्यंत करावी या लागवडीपासून आपणास डिसेंबर पासून उत्पादन मिळण्यास सुरूवात होते. तर कोकण विभागात पावसाचा जोर ओसल्यावर म्हणजेच ऑगस्ट - सप्टेंबर मध्ये लागवड करावी. तर रब्बी हंगामातील किंवा उशीराची लागवड ही 15 नोव्हेंबर - 1 जानेवारी या दरम्यान करावी. यापासून आपणास 15 मे नंतर उत्पादन मिळण्यास सुरूवात होते.

**शेवग्याचे वाण** :- सद्या शेवग्यामध्ये विविध कृषी विद्यापीठांनी संशोधित केलेले वाण लागवडीस उपलब्ध आहेत तसेच काही खाजगी उत्पादक, शेतकरी, शेवग्याचे बियाणे वेगवेगळ्या नावाने बाजारात उपलब्ध करत आहे. परंतू कृषी विद्यापीठांचे वाण उत्पादनामध्ये सरस आहेत. त्याची माहिती खाली दिलेली आहे.

1) **कोकण रूचिरा** :- या वाणाच्या शेंगा गर्द हिरव्या, मध्यम लांबीच्या 50-55 सेमी व त्रिकोणी आकाराच्या असतात, गराचे प्रमाण भरपूर आहे व शेंगा चविस उत्कृष्ट आहेत. सरासरी 35-40 किलो शेंगा प्रति झाड प्रति वर्षे मिळतात. जास्त पावसाचे प्रदेशासाठी म्हणजे कोकण विभागासाठी हा वाण चांगला आहे.
2) **पी.के.एम-1** :- लागवडीपासून 6 महिन्यात उत्पादन सुरू होते, शेंगाची लांबी 65-70 सेमी, शेगांचे वरच्या बाजूस तांबूस छटा असते. प्रतिवर्षे एका झाडापासून 200 - 225 शेंगा मिळतात. एका एका वर्षात दोन हंगाम किंवा 2 वेळा बहार धरता येतो. शेंगा वजनदार व चविष्ट असतात. कमी पाण्यावर व उष्ण हवामानात भरपूर व बारमाही फळे मिळतात.
3) **पी.के.एम-2** :- या वाणाच्या शेंगा आखूड 20-25 सेमी, गर्द हिरवा, चविस उत्कृष्ट असतात. उच्च उत्पादनक्षम वाण, शेंगा झुपक्याने लागतात, निर्यातीस जास्त पसंती असलेला वाण. एका झाडापासून 250 - 400 शेंगा मिळतात. हा एकात्मिक खत व्यवस्थापनास उत्तम प्रतिसाद देतो

4) **ओडिसी 2** :- हा वाण सुध्दा पीकेएम-2 प्रमाणे गुणधर्माचे बाबतीत आहे. हिरव्या गर्द शेंगा, 6 महिन्यात उत्पादन सुरू होते. बाजरात जास्त मागणी असणारा वाण. शेंगाची लांबी 45-60 सेमी.

5) **भाग्या (केडीएम - 1)** :- या वाणाची लागवड 8 X 8 फूटावर करता येते परंतू योग्य छाटणी तंत्रज्ञान वापरावे लागते. 4 ते 5 महिण्यात फळधारणा होते, आकर्षक हिरव्यागार शेंगा, 60-65 सेमी लांबीच्या, फांद्याचे प्रमाण जास्त व भरपूर उत्पादन मिळते. 200-300 शेंगा प्रति झाड उत्पादन मिळते. शेंगाची लांबी 45-75 सेमी, मध्यम उंचीचा वाण, सघन लागवडीसाठी तसेच कोरडवाहू पिक म्हणून फायदेशीर.

सद्यस्थितीत पीकेएम-2 व ओडिसी-2 या वाणाची लागवड फायदेशीर ठरू शकते. हे वाण लागवडीसाठी शेतकऱ्यांनी वापरावेत.

**लागवड पध्दत** :- शेवग्याची लागवड शक्यतो बिया टोकण पध्दतीने करावी, शेवग्याची रोपे तयार करून पण लागवड करता येते परंतू बी खड्ड्याचे मधोमध टोकण करावी, एका खड्डयात 2 बियाची टोकण करावी. बियाद्वारे लागवड केल्यास मुळांचा विस्तार चांगला होतो. रोपाची लागवड करताना रोप नाजूक असल्याने त्याचे खोड मोडण्याची शक्यता असते.



10-12 दिवसात बियाची उगवण होते त्यानंतर 15 दिवसानी ज्या रोपांचे खोडास लालसर रंग असतो अशी " नर रोपे " उपटून टाकावीत. एका खड्ड्यात एक निरोगी, सशक्त रोपे ठेवावे.

बियाणे टोकण करण्याचे पूर्वीचे दिवशी कोमट पाण्यात बिया भिजवत ठेवाव्यात. सकाळी पाणी काढून बियाणे सुकवावे व त्यास ट्रायकोडर्मा, ॲझोस्पिरिलियम, स्फुरद विरघळणारे जिवाणू व पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू प्रत्येकी 5 ग्रॅम हलक्या हाताने चोळावे व लगेच बियांची टोकण करावी या बिजप्रक्रियेमुळे रोपांची मर होत नाही.

बियाणे शक्यतो शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष शेवगा बाग पाहून घ्यावे त्यासाठी ज्या शेवगा झाडापासून बी तयार केले आहे, त्या बागेची पाहणी करावी. किंवा कृषी विद्यापीठांकडून बियाणे खरेदी करावे. शक्यतो खाजगी उत्पादक, अनोळखी व्यक्ती व वरिल दोन वाणाव्यतिरिक्त वाणांची बियाणे विकत घेऊ नये. एक एकरसाठी 625 ग्रॅम बियाणे पुरेसे होते.

## पाणी व्यवस्थापन

शेवगा पिकास सुरूवातीचे वाढीचे काळात पाण्याची गरज कमी असते. शेवगा पिक पाण्यास अत्यंत संवेदनशील असून, पिकामध्ये पावसाळ्याचे तसेच सिंचनाचे पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सुरूवातीचे काळामध्ये पाणी जास्त झाले तर रोपांची मर होते. या पिकास परंतू फूल, फळ पोसणे या अवस्थेत जास्त पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी रोपांचे 1 फूट अंतरावर दोन्ही बाजूने 16 MM चे दोन लॅटरल अंथरून घ्याव्यात शक्यतो ईनलाईन लॅटरल वापराव्यात व त्यांचे ड्रिपरचा डिसर्चाज हा 2 लिटर प्रति तास एवढा असावा. सुरूवातीस झाडाची पाण्याची गरज कमी असल्याने लॅटरच्या दोन्ही बाजूस मेथी, कोथिंबीर, झेंडू ई. सारख्या कमी उंचीचे आंतर पिकाची लागवड केल्यास पाण्याचा अपव्यय टळून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पादन मिळते.

तसेच झेंडू आंतर पिकामुळे मधमाश्यांचे प्रमाण वाढते व फुले, फळधारणा चांगली होते. या पिकास रोपांचे / झाडाचे वय, वातावरण, वाढीची अवस्था, जमिनीचा प्रकार या नुसार पाण्याचे नियोजन करावा. झाडाचे मुळ्यांच्या कक्षेत सतत वाफसा स्थिती राहिल याची दक्षता घ्यावी. फुले यायला सुरू झालेवर फळाचे सेटिंग होईपर्यंत पाण्याचा ताण द्यावा. शेवग्यास पाण्याचा ताण दिला नाही तर एकाचवेळी झाडास फूले / फळे लागत नाहीत. जमिनीचे प्रकारानुसार ताणाचा कालावधी 10-15 दिवस असू शकतो.



## एकात्मिक खत व्यवस्थापन

शेवग्यास प्रति वर्षे प्रति झाड 20-25 किलो शेणखत, 75 ग्रॅम नत्र, 75 ग्रॅम स्फुरद व 75 ग्रॅम पालाश ची शिफारस कृषि विद्यापीठांची केलेली आहे. वरिल खत हे बहार धरण्यापूर्वी म्हणजेच फूले लागण्याचे पूर्वी झाडाचे चारही बाजूने 1-1.5 फूट अंतरावर गोलाकार आळे तयार करून 10-15 सेमी खोलीवर द्यावीत. नत्राची मात्रा 2/3 हप्त्यात विभागून द्यावी.

वरिल प्रमाणे खताचे नियोजन / मात्रा देण्यासाठी दर 2-3 महिन्यांनी 200 ग्रॅम 10:26:26, 100 ग्रॅम युरिया व 50-100 ग्रॅम सूक्ष्मअन्नद्रव्ये दिल्यास उत्कृष्ट दर्जाचे, भरपूर उत्पादन मिळते.

तसेच पाण्यात विरघळणारी खते ठिबकमधून द्यावयाची असतील तर एकरी झाडाची संख्या, बेसल डोस चे प्रमाण ई. चा विचारात घेऊन 19:19:19, 12:61:00, 13:40:13, 00:52:34, 00:00:50 व पोटॅशियम शोनाईट एकरी 3-5 किलो वाढीचे अवस्थेनुसार आठवड्यातून एक वेळा दिल्यास उच्च दर्जाचे भरपूर उत्पादन मिळते.

## पिकाचा शेंडा मारणे, छाटणी करणे

शेतकरी बहुतेक पिकाची लागवड कमी अंतरावर करत आहेत त्यासाठी छाटणी तंत्रज्ञान, माहिती करून घेणे खूप महत्वाचे आहे. शेवगा हे पिक जलद वाढणारे, नाजूक खोड व फांद्या असणारे आहे. त्यासाठी पिकाची उंची मर्यादित ठेवावी लागते ज्यामुळे फवारणी करणे, शेंगा तोडणे ई. सारखी कामे सुलभ रितीने करता येतात. यासाठी मुख्य खोड 1 ते 1.5 मीटर उंचीचे झाले की त्याचा शेंडा मारावा म्हणजे 3 फूटाचे आसपास मूख्य खोडाचा शेंडा मारावा त्यानंतर बाजूच्या फांद्या वाढतात पुन्हा

त्या फांद्याची लांबी 1 मीटर झालेवर त्यांचा शेंडा मारावा, त्याचे मधून पुन्हा निघणाऱ्या उपफांद्याचाही एक महिन्याचे दरम्यान शेंडा मारावा ज्यामुळे मुख्य खोड मजबूत होऊन फांद्याची संख्या भरपूर होईल व झाडाची उंची मर्यादित ठेवता येईल. थोडक्यात दर 21-25 दिवसाने मुख्य खोडास येणाऱ्या उपफांद्याचा शेंडा खुडावा, खोड जमिनीपासून जस जसे वरती वाढत जाईल तस तसे 1 मीटर पर्यंत मुख्य खोडावरील येणाऱ्या फांद्या व फुटवे काढत राहावे. या प्रमाणे छाटणी तंत्रज्ञान वापरून झाडास आकार द्यावा.

फांद्याची छाटणी करताना एकमेकास घासणाऱ्या, वाकड्या, तिरक्या फांद्या व जमिनीचे दिशेने वाढणाऱ्या फांद्या काढून टाकाव्यात.

बहार संपल्यावर झाडाचे वयाप्रमाणे पुढील हंगामासाठी छाटणी घ्यावी. यामध्ये खरड छाटणी, मध्यम छाटणी व हलकी छाटणी करावी. झाड 2/3 वर्षाचे झाले असेल तर एप्रिल मे मध्ये मुख्य खोड जमिनीपासून 1/2 ते 1 फूटावर कापून घ्यावे. त्यानंतर त्यास येणाऱ्या फांद्याचा नियमित शेंडा मारावा. अशा छाटलेल्या झाडास 4-5 महिन्यानी शेंगा विक्रीस तयार होतात.



मध्यम प्रकारचे छाटणीमध्ये 4-4.5 फूटावरील सर्व फांद्या छाटाव्यात व येणाऱ्या फूटव्याचे शेंडे मारावेत. या प्रकारची छाटणी केल्यास 3 महिन्यानंतर झाडावरील शेंगा विक्रीस सुरूवात होते.

हलक्या प्रकारचे छाटणीमध्ये सर्व फांद्या ठेवून त्यांची फांद्या जेथून फुटलेल्या आहेत त्या पुढे 30 सेमी ठेवून छाटणी केली जाते अशी झाडे 2-3 महिन्यात उत्पादन देतात परंतू उत्पादन कमी मिळते.

आपले पिक व्यवस्थापन, जमिनीचा प्रकार, पाण्याची सुविधा, धरावयाचा हंगाम याबाबत शेतकऱ्यांनी नियोजन करून छाटणी करावी. शेवगा या पिकामध्ये एका वर्षात दोन हंगाम घेता येतात.

**पीक संजीवकांचा वापर** - शेवगा झाडाची उंची मर्यादित ठेवून फांद्याचा चांगला विस्तार होण्यासाठी पावसाळ्याचे सुरूवातीस छाटणी झालेवर 1000 पीपीएम लिहोसील किंवा सायकोसिल आळवणी करावी.

पीक फुलोऱ्यात असताना फुलगळ कमी करणेसाठी व फळांचे सेटींग वाढविण्यासाठी एन ए ए 10 पीपीएम अधिक चिलेटेड झिंक - अर्धा ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## किड व रोग व्यवस्थापन

शेवग्यामध्ये रस शोषण करणाऱ्या किडी (फुलकिडे व लालकोळी), भूरी, डिंक्या, केसाळ अळी, पाने खाणाऱ्या अळ्या, खोड पोखरणारी अळी, फळमाशी ई. किडीचा व रोगाचा प्रार्दूभाव होतो. त्यासाठी एकात्मिक किड नियंत्रणाचे उपाय योजावेत.

हे पिक किटकनाशक व बुरशीनाशकांप्रती अत्यंत संवेदनशील असून शिफारस असलेली किडनाशके, शिफारशीतील प्रमाणात घेवून दर 10-15 दिवसाचे अंतराने फवारणी घ्यावी. तसेच शेवगा पिक हे परपरागीकरण होत असल्याने शेतामध्ये फूल अवस्थेत मधमाश्याद्वारे परागीकरण होण्यासाठी रासायनिक किटकनाशकाचा वापर टाळावा.



**एकात्मिक किड व रोग नियंत्रणासाठीच्या उपाययोजना.**

- आंतर मशागत करून जमिन खालीवर करावी, तण नियंत्रण करावे.
- लागवड शिफारस केलेल्या अंतरावर करावी, खूप कमी आंतरावरील लागवड टाळावी.
- लागवड हलक्या ते मध्यम व उत्तम निचऱ्याच्या जमिनीत करावी.
- छाटणी व्यवस्थित करावी. प्रत्येक फांदीवर पुरेसा सूर्यप्रकाश व खेळती हवा राहिल याची काळजी घ्यावी, फांद्याची दाटी ( गर्दी ) होणार नाही हे पाहावे.
- पावसाळ्यात बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेस आवश्यक तेवढेच म्हणजे काटेकारेपणे पाणी द्यावे. जमिनीची प्रत, तापमान, पिकाची अवस्था यांचा विचार करून पाणी द्यावे.
- शेवग्याचे खोडास पाणी लागणार नाही हे पाहावे अन्यथा खोडकूज होते.
- एकरी 20-40 चिकट सापळे, रस शोषण करणाऱ्या किडी जसे की फूलकिडे व कोळी नियंत्रणासाठी लावावेत.
- प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत जैविक किडनाशकांच्या आळवण्या पावसाळ्यात व हिवाळ्यात घ्याव्यात.
- प्रकाश सापळा एकरी एक लावावा.
- जैविक व वनस्पतीजन्य (लिंबोळी अर्क 5%) फवारण्या नियमितपणे घ्याव्यात.
- बागेचे नियमितपणे सर्वेक्षण करावे. बागेवर जैविक, अजैविक ताण येणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- किड व रोगांसाठी हवामानात होणारे बदलावर लक्ष द्यावे व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.
- भूरी नियंत्रणासाठी गंधक 80% WP 2 ग्रॅम / लिटर पाणी व प्रार्दूभाव जास्त असल्यास हेक्झाकोनॅझोल 0.5 मिलि प्रति लिटर किंवा ॲझाक्सिस्ट्रोबीन 100 मिलि प्रति एकर ठिबकमधून सोडावे.
- मर व मूळकूज साठी ट्रायकोडर्मा ठिबकमधून 1 किलो / एकर किंवा शेणखतामध्ये मूरवून 2 किलो / एकर द्यावा.
- खोड पोखरणाऱ्या अळीसाठी क्लोरोपायरिफॉस 2.5 मिलि प्रति लिटर द्रावण खोडात पडलेल्या छिद्रामधून सोडावे व छिद्र बंद करावे.
- पाने खाणाऱ्या अळीसाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन किंवा मोनोक्रोटोफॉस 1.5 मिलि प्रति लिटर पाणी किंवा बाओ 303 किंवा क्लोरॅन्ट्रनिलीप्रोल 18.5% SC (FMC - कोरोजन) - अर्धा मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेवून फवारणी करावी.

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!

## फळमाशी

शेवग्यामध्ये फळमाशीचा प्रादूर्भाव फार मोठ्या प्रमाणात होतो. फळमाशीचा प्रौढ कोवळ्या शेंगेमध्ये अंडी घालतो. 3-4 दिवसात त्यातून अळ्या बाहेर पडतात. ह्या अळ्या शेंगातील गर खातात त्यामुळे शेंगातून डिंक बाहेर येतो व शेंग सडते किंवा वाळते. फळमाशीचे नियंत्रणासाठी

फेन्थिऑन 80 इसी - 0.04% किंवा

इमामेक्टिन बेन्झोएट 5SG - 0.25 ग्रॅम / लिटर किंवा

स्पिनोसॅड 45%SL - 0.2 मिली / लिटर

या पैकी कोणतेही एका किटकनाशकाची फवारणी घ्यावी व आवश्यकतेनुसार पुढील फवारण्या वेगळ्या किडनाशकांच्या घ्याव्यात. तसेच थायोमिथोक्झाम 25% WG, 280 ग्रॅम / एकरी मातीत मिसळून द्यावे.

## काढणी व उत्पादन

शेवग्याचे शेंगा जातीनुसार लागवडीनंतर 5-6 महिण्यांनी तोडायला येतात व पुढे 3-4 महिने तोडे होतात. ज्या शेंगाचा पीळ पूर्णपणे उलगडला आहे अशा हिरव्या गर्द, योग्य ते लांबी व जाडीचे शेंगाची काढणी करावी. शेंगा हाताने देठापासून सहज तूटतात, जास्त उंचीवरील शेंगा इटालियन कात्रीद्वारे काढाव्यात. स्थानिक बाजारासाठी 14 MM ते 16 MM जाडी 1 ते 2 फूट लांबीचे शेंगा काढाव्यात. निर्यातीसाठी 16 MM जाडीचे 90-120 सेमी लांबीच्या परिपक्व शेंगाची काढणी करावी व त्याची प्रतवारी करून घ्यावी, किडक्या, वाकड्या, कमी लांबीचे शेंगा वेगळ्या कराव्यात. एकसारख्या लांबीचे व जाडीच्या शेंगा कागदी बॉक्समध्ये भरून निर्यातीसाठी पाठवाव्यात. स्थानिक बाजारपेठेसाठी प्लास्टीक क्रेट किंवा गोणपाटात शेंगा पाठवल्या जातात. शेवग्यास डिसेंबर ते मार्च या दरम्यान उच्च बाजारभाव मिळतो तर मार्च ते मे च्या दरम्यान कमी बाजारभाव असतो.

सरासरी 1 झाडापासून 20-25 किलो शेंगा मिळतात. तर एकरी 9-10 टन शेंगा एका हंगामात मिळतात. जमिनीचा प्रकार, वाणाची उत्पादन क्षमता, हंगामातील वातावरण व शेतकऱ्यांनी केलेले पिक व्यवस्थापन यावर उत्पादन कमी जास्त होऊ शकते.

